आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक २१ सप्टेंबर २०२५

ठळक बातम्या

1. उद्यापासून लागू होणाऱ्या 'जीएसटी सुधारणा' देशवासियांसाठी बचत उत्सव असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन: स्वदेशी वापरावर भर देण्याचं केलं आवाहन.
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्तानं भाजप युवा मोर्चाच्या 'नमो युवा रन फॉर नशा मुक्त भारत' कार्यक्रमाचा प्रारंभ.
3. नागपूरच्या कोराडी देवस्थानासह शारदीय नवरात्रौत्सवानिमित्त राज्यात जय्यत तयारी.
4. आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर फोर मध्ये भारताचा पाकिस्तान विरुद्ध सामना.

पंतप्रधान संबोधन

देशभरात उद्यापासून जीएसटी सुधारणा लागू होणार असून हा देशवासियांसाठी बचत उत्सव आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. त्यांनी देशवासियांना आज दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित केलं....

*कल से देश में जीएसटी बचत उत्सव शुरू होने जा रहा है। इस जीएसटी बचत उत्सव में आपकी बचत बढ़ेगी और आप अपनी पसंद की चीजों को और ज्यादा आसानी से करीब पाएंगे। हमारे देश के गरीब, मध्यमवर्गीय लोग, न्यू मिडल क्लास, युवा, किसान, महिलाएं, दुकानदार, व्यापारी, उद्यमी सभी को ये बचत उत्सव का बहुत फायदा होगा।*

देशाची आजची परिस्थिती आणि भविष्यातली स्वप्नं लक्षात घेऊन जीएसटी प्रणालीत सुधारणा केल्याचं मोदी यांनी सांगितलं. आता ५ आणि १८ टक्के अशा दोन स्लॅबमधे जीएसटी आकारला जाणार आहे, त्यामुळे दैनंदिन गरजेच्या वस्तू स्वस्त होतील, सूक्ष्म, लघू उद्योगांनाही याचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल, असं पंतप्रधान म्हणाले. जीएसटी सुधारणांमुळे देशातली गुंतवणूक वाढेल, विकासाचा वेग वाढेल. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपल्या दैनंदिन वापरातल्या अनेक वस्तू विदेशी आहेत, त्यांचा त्याग करून स्वदेशी सामानच खरेदी करावं असं आवाहन मोदी यांनी केलं. तसंच राज्यांनीही स्वदेशी

उत्पादनाला वेग द्यावा, केंद्र आणि राज्यांनी मिळून काम केलं तर आत्मनिर्भर भारताचं स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. आत्मनिर्भर भारताचं स्वप्न लघु आणि मध्यम उद्योगांच्या विकासावर अवलंबून असल्याचं सांगत पंतप्रधान मोदी यांनी स्वदेशी उत्पादनावर भर दिला.

<u>जीएसटी</u>

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर रचनेत सुधारणा करण्याचा केंद्रसरकारचा निर्णय उद्यापासून लागू होणार आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रातल्या उत्पादनांच्या किमतीवर तसंच ग्राहकांवर याचा सकारात्मक परिणाम होणार आहे. या संदर्भांत अमरावती येथील सौंदर्य प्रसाधनांचे विक्रेते सचिन लहाने यांनी प्रतिक्रिया दिली-

*सेंट्रल गवर्नमेंटनी जे जीएसटी रेट दर कमी केलेले आहे, त्यानुसार उद्यापासून एमआरपी वर जे पहिले 28% जीएसटी लागू होती ती आता 12 पर्सेंटवर आलेली आहे. त्यामुळे निश्चितच ग्राहकांना फायदा होईल आणि उद्यापासून तो फायदा चालू होईल.*

<u>नमो युवा रन</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्तानं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबई भाजप युवा मोर्चाच्या 'नमो युवा रन फॉर नशा मुक्त भारत' कार्यक्रमाचा शुभारंभ केला. नशामुक्त भारत, नशामुक्त महाराष्ट्र आणि नशामुक्त मुंबई या संकल्पनेवर आधारित या 'नमो रन मॅरेथॉन' मुळे आपली तरुणाई, देशाला सर्वोच्च स्थानी नेण्याच, तसच देशाला आत्मनिर्भर करण्याच्या ध्यासान प्रेरित होईल. असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. राज्यात अनेक ठिकाणी भाजपच्या पुढाकारान 'नमो युवा रन' आयोजित करण्यात आले होते. बुलढाणा जिल्ह्यात जळगाव जामोद मतदार संघात देखील नमो युवा रन मॅरेथॉन आयोजित करण्यात आली होती. शहरातील युवक युवती तसच सर्व स्तरातील नागरिक या मॅरेथॉन मध्ये सहभागी झाले होते.

<u>सेवा पर्व</u>

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्वसमावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. केंद्र सरकारनं देशात यूपीआय क्रांती घडवून आणल्यामुळे डिजिटल व्यवहारात वाढ झाली आहे. यामुळे डिजिटल पेमेंट करणं सोपं आणि सुरक्षित झालं आहे.

*(केंद्र सरकारनं गेल्या दशकभरात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अनेक बदल घडवून आणले. यूपीआय हा या बदलातला महत्त्वपूर्ण भाग आहे. २०१६ ला देशात यूपीआय सुविधा सुरू झाली. विविध बँक खाती एकाच ऍप्लिकेशनमधे एकत्रित आल्यामुळे पेमेंट करणं सुलभ झालं.*

*साथियों यूपीआई का हमारा प्लेटफार्म आज दुनिया को अजूबा कर रहा है। हमारे में सामर्थ्य है रियल टाइम ट्रांजेक्शन में 50% अकेला भारत यूपीआई के माध्यम से करता है।*
*गेल्या नऊ वर्षांत यूपीआयचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. ऑगस्ट २०२५ मधे यूपीआयद्वारे २० अब्ज रुपयांपेक्षा जास्त पैशांचा व्यवहार झाल्याची नोंद आहे. यूपीआयचा विस्तार आता देशासह आंतरराष्ट्रीय पातळीवरही झाला आहे. संयुक्त अरब अमिराती, भूतान, बांगलादेश, श्रीलंका, मॉरिशस, फ्रान्स यांसारख्या देशातही आता यूपीआयचा वापर होत आहे. कॅशलेस अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्यात आणि आर्थिक समावेशनाला चालना देण्यात यूपीआयनं महत्त्वाची भूमिका बजावली आहे.)*

<u>चंद्रशेखर बावनकुळे</u>

जनतेच्या विश्वासार्हतेच्या बळावर आज कोराडी, महादुला, कामठी सह नागपूरच्या भागातील अनेक वर्षांपासून झोपडीत राहणाऱ्या व्यक्तींना ते राहत असलेल्या जागेची सनद देता येण शक्य झाल्याचं प्रतिपादन राज्याचे महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं. सेवा पंधरवाड्यात राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या अनुषंगान नागपूर जिल्ह्यातील महादुला येथे कोराडी देवीच्या महाप्रवेश द्वाराजवळ आयोजित गरजू लाभार्थ्यांना पट्टे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

<u>नवरात्र महोत्सव</u>

शारदीय नवरात्र उत्सवाला उद्यापासून प्रारंभ होत असून नवरात्र महोत्सवासाठी राज्यातील कोल्हापूर, तुळजापूर, सप्तशृंगी आणि माहूर या शक्तीपीठांची मंदिरं सज्ज झाली आहेत. उद्यापासून सुरू होणाऱ्या या महोत्सवात नागपूर जिल्ह्यातील कोराडी देवस्थानासह देवीच्या सर्व मंदिरांमध्ये लोकांच्या सुरक्षेच्या दृष्टीन आवश्यक उपाय योजना पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहेत. इतर गावांमधून येणाऱ्या भाविकांसाठी वाहनतळ, स्वच्छतागृह आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आल्या आहेत.

विशेष बस सेवा

नवरात्री आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर नागपूर महानगर परिवहन महामंडळान शहरातील जनतेसाठी ११० विशेष बस चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे भाविकांना प्रवास करण अधिक सोयीस्कर होणार आहे.

प्रतापराव जाधव

पूरग्रस्तभागातील नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी 'सेवक रथ' मोबाइल वैद्यकीय सेवा सुरू करण्यात आली आहे. हे युनिट पूरग्रस्त भागात जाऊन नागरिकांना उपचार सेवा देईल, अशी माहिती केंद्रीय आयुष, आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा परिसरामध्ये 15 सप्टेंबर रोजी झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळ नागरिकांच मोठ्या प्रमाणात नुकसान झाल होत.

*कुठल्याही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेला असेल त्यांना मदत शासनाकडून मिळाली पाहिजे म्हणून तसे सर्वे करण्याचे पंचनामे करण्याचे निर्देश संबंधित सर्व गावांचा ग्रामसेवक असेल, तलाठी असेल, कृषी सहायक असेल या सगळयांना दिलेले आहे.*

आशिया चषक क्रिकेट

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर फोर मध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान सामना होणार आहे. दुबईत भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता या सामन्याला सुरुवात होईल. भारतीय संघानं या स्पर्धेत पाकिस्तान विरुद्धच्या या आधीच्या सामन्यात सहज विजय नोंदवला आहे. हा सामना जिंकल्यास भारताला थेट अंतिम सामन्यात प्रवेश मिळेल. अंतिम सामना येत्या २८ डिसेंबरला होणार आहे.

हवामान

येत्या काही तासात चंद्रपूर, गोंदिया, अमरावती, वर्धा, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यांमधील काही ठिकाणी वादळ आणि विजांच्या कडकडाटासह हलका ते मध्यम पाऊस, तसच भंडारा, नागपूर, वाशीम आणि अकोला जिल्ह्यांमधील काही ठिकाणी हलका पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागान वर्तवली आहे. उद्या यवतमाळ आणि गडचिरोली इथे वादळाचा येल्लो अलर्ट जाहीर केला आहे.

दारूबंदी

गडचिरोली जिल्ह्यात हालूर गावातल्या महिलांच्या पुढाकारान सर्व ग्रामस्थांनी मिळून गावात दारुबंदीचा ठराव मंजूर केला. व्यसनमुक्ती क्षेत्रात काम करणाऱ्या “लॉईड्स इन्फिनिट”फाउंडेशनच्या पाठिंब्यानं गावाच्या समग्र विकासासाठी गावातल्या महिलांनी हे ऐतिहासिक पाऊल उचललं आहे.

*****